260700054

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly Pune University)

**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**
**गणेशखिंड, पुणे - ४११००७**
**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२११८८/८९**
**ई-मेल : affiliation.unipune.ac.in**
**संकेतस्थळ : www.unipune.ac.in**

Academic Section (Affiliation Unit)
Ganeshkhind, Pune - 411007
Phone : 020-25621188/89
E-mail: affiliation.unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र.: सीए/७१९-१२६ दि.:०७/०७/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य,
महाराष्ट्र शासन शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय पत्ता: अवसरी
खुर्द , तालुका-आंबेगाव , जिल्हा-पुणे -४१२४०५ ता.: आंबेगाव जि: पुणे
पिनकोड: 412405
[CEGP014980]

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७, या वर्षाकरिता संलग्नीकरणाचे नूतनीकरण / नैसर्गिक वाढीबाबत ...**

महोदय/महोदया ,

उपरोक्त विषयासंदर्भात विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७, करिता खालील रकान्यात नमूद केलेल्या अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणाच्या नूतनीकरण / नैसर्गिक वाढीस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच विद्यापीठ अनुदान आयोग / संबंधित शिखर संस्था / परिषद / नियामक मंडळ, केंद्र शासन, महाराष्ट्र शासन आणि प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या आणि येणाऱ्या नियम / आदेश / मार्गदर्शक तत्त्वे/ परिनियम / अध्यादेश इत्यादींमधील तरतुदींच्या अधीन राहून त्याचप्रमाणे प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक इ. लागू पदे तात्काळ कायमस्वरूपी नियमित प्रक्रियेने भरून त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्याची पूर्तता सदर पत्र निर्गमित झालेल्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे. (तीन महिने संपण्याचा कालावधी : दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२६ )

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचा तपशील | विद्यार्थी संख्या | वर्ष व तुकडी | संलग्नीकरणाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | बी. ई. ऑटोमोबाइल | 60 | वर्ष पहिले ते चौथे- Div No.1, | नूतनीकरण |
| 2 | बी.ई. (इन्स्ट्रुमेंटेशन & कंट्रोल) | 60 | वर्ष पहिले ते चौथे- Div No.1, | नूतनीकरण |
| 3 | बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्यूनिकेशन) | 60 | वर्ष पहिले ते चौथे- Div No.1, | नूतनीकरण |
| 4 | बी.ई. (कॉम्प्युटर) | 60 | वर्ष पहिले ते चौथे- Div No.1, | नूतनीकरण |
| 5 | बी.ई. (मेकॅनिकल) | 60 | वर्ष पहिले ते चौथे- Div No.1, | नूतनीकरण |
| 6 | बी.ई. (सिविल) | 60 | वर्ष पहिले ते चौथे- Div No.1, | नूतनीकरण |

प्रस्तुत विद्यापीठाकडून यापूर्वी वेळोवेळी आपणास कळविण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता विहित कालावधीमध्ये न केल्यास आणि बृहत आराखड्यानुसार महाविद्यालय ज्या बिंदूवर मान्यता मिळून स्थापन झाले आहे ,त्याच जागेवर कार्यरत असणे अनिवार्य असून याबाबतची वस्तुस्थिती विपरित आढळल्यास शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७, करिता देण्यात आलेले संलग्नीकरणाचे नूतनीकरण /नैसर्गिक वाढीबाबतचे पत्र रद्द करण्याबाबतची पुढील आवश्यक ती विहीत प्रशासकीय प्रक्रिया सुरु करण्यात येईल . तसेच आपल्या महाविद्यालयाविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार तसेच सन २०१९ चे एकरूप परिनियम क्र. १ नुसार कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सोबत देण्यात आलेल्या विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र / हमीपत्र ७ दिवसात सादर न केल्यास २०२६-२०२७, करिता देण्यात आलेले संलग्नीकरणाचे नूतनीकरण /नैसर्गिक वाढीबाबतचे सदरचे पत्र रद्द करण्याबाबतची पुढील आवश्यक ती विहीत प्रशासकीय प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

प्रस्तुत विद्यापीठाच्या BOD Profile मध्ये नमूद केलेली माहिती ही बरोबर व खरी आहे तसेच विद्यापीठ मान्यता प्राप्त नियमित व तदर्थ स्वरूपात किमान 50% नियुक्तीबाबत BOD Portal भरलेल्या माहितीची पूर्णपणे जबाबदारी ही संस्था / महाविद्यालयाची राहील तसेच त्यात काही चूक आढळून आल्यास त्यास संस्था / महाविद्यालय जबाबदार राहील आणि २०२६ -२७ करीता देण्यात आलेले सलग्नीकरणाचे नूतनीकरण / नैसर्गिक वाढ / नवीन अभ्यासक्रम / विद्यार्थी संख्या वाढ / विद्यार्थी संख्या कमी बाबतचे सदरचे पत्र रद्द करण्याबाबतची पुढील आवश्यक ती विहित प्रशासकीय प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

आपला,

(प्रदिप कोळी)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

**<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित -</u>**
मा. अध्यक्ष/सचिव, संबंधित महाविद्यालयाचे/ मान्यताप्राप्त परिसंस्थेचे व्यवस्थापन पाहणारी संस्था